पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ याचे
पर्यवेक्षण व नियंत्रण पोलीस आयुक्त, मुंबई
यांचेकडून विशेष पोलीस महानिरीक्षक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सोपविणे.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग.

शासन निर्णय गृह विभाग क्र. टीईएक्स-०३९७/सीआर-८१५/पोल-५अ,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ०९जानेवारी, १९९८.

वाचा : १] शासन निर्णय गृह विभाग क्र. टीईएक्स-०३९३/सीआर-५९३/पोल-५अ, दि. ३१ जानेवारी, १९९५.

२] पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अर्धशासकीय पत्र क्र. प्रशिक्षण/आस्था-१/मरोळ-४/९७/५०/xxxx५६२ दि. १२.११.१९९७.

शासन निर्णय :-

शासन निर्णय गृह विभाग क्र. टीईएक्स-०३९३/सीआर-५९३/पोल-५अ, दिनांक ३१ जानेवारी, १९९५ च्या परिच्छेद एक मध्ये नमूद केलेल्या उपपरिच्छेद एक ते चार मधील नमूद×केलेल्या×उपपरिच्छेद× मजकूर वगळण्यात यावा. शासन आता खालीलप्रमाणे सुधारित आदेश देत आहे :-

[१] पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळचे पर्यवेक्षण व नियंत्रण संपूर्णतः विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके व पोलीस महासंचालक यांचे अधिपत्याखाली देण्यात येत आहे. त्यामुळे पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ चे वार्षिक अंदाजपत्रक विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके यांचे मार्फत.. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य xxxx यांना पाठविण्यात यावे.

[२] पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ चे पर्यवेक्षण व नियंत्रण हे संपूर्णतः विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई तसेच पोलीस महासंचालक यांच्या अधिपत्याखाली देण्यात येत असल्यामुळे विभागप्रमुख तसेच प्रादेशिक विभागप्रमुख म्हणून ज्या प्रकरणी मंजूरी आवश्यक असेल ती सर्व प्रकरणे पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडे न पाठविता ती अनुक्रमे प्रादेशिक विभागप्रमुख यांच्या मंजूरीसाठी विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके यांचेकडे व विभाग प्रमुखांच्या मंजूरीसाठी विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण

....२/-

महासंचालक,
व खास पथके यांचे मार्फत [illegible] [illegible], महाराष्ट्र राज्य यांना पाठविण्यात यावे.

[३] पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळचे पूर्ण पर्यवेक्षण व नियंत्रण संपूर्णत: विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे अधिपत्याखाली वर्ग केल्यामुळे पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ येथे कार्यरत असलेले सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे विभागीय शिस्तभंग कार्यवाहीची प्रकरणे पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडे न पाठविता ती प्रकरणे यापुढे विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकडे पाठविण्यात यावेत.

[४] पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळचे पर्यवेक्षण व नियंत्रण संपूर्णत: विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे अधिपत्याखाली देण्यात आल्यामुळे राज्यातील इतर पोलीस प्रशिक्षण विद्यालयानुसार पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ येथील प्रमुखाचे नामाभिधान "प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ" असे करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांना कार्यालय प्रमुख घोषित करण्यात येत असून त्या पदासाठी राज्यातील इतर पोलीस प्रशिक्षण विद्यालयांच्या प्रमुखांना देण्यात आलेले प्रशासकीय व वित्तीय अधिकार देण्यात येत आहेत.

[५] पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळचे पर्यवेक्षण व नियंत्रण संपूर्णत: विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे अधिपत्याखाली वर्ग केल्यामुळे पोलीस प्रशिक्षण विद्यालय-मरोळ येथे अस्तित्वात असलेली पदे उदा. पोलीस उप आयुक्त [पोलीस अधीक्षक], सहाय्यक पोलीस उप-आयुक्त [पोलीस उप अधीक्षक], पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, वरिष्ठ पोलीस अभियोक्ता, पोलीस अभियोक्ता ही सर्व पदे पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या संवर्ग/आस्थापनेवरुन प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्यात येत असल्यामुळे त्यांच्या नियुक्त्या या पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे करण्यात येतील. तसेच पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ येथे अस्तित्वात असलेली कवायत निदेशकाची पदे, पोलीस शिपायांची पदे, पोलीस चालकांची पदे व इतर कार्यकारी कर्मचाऱ्यांची पदे देखील पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या संवर्ग/आस्थापनेवरुन प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्यात येत आहेत. वरील कवायत निदेशकांची पदे विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके यांचेद्वारे एक टप्पा पदोन्नतीने भरण्यात येतील. व पोलीस शिपाई/पोलीस चालक तत्सम पदे ही पोलीस

आयुक्त, मुंबई यांच्या संख्याबळातून विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, यांचेद्वारा करण्यात येतील.

[६] पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळचे पर्यवेक्षण व नियंत्रण संपूर्णत: विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, व पोलीस महासंचालक यांचे अधिपत्याखाली वर्ग केल्यामुळे पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ यांच्या आस्थापनेवरील लिपीक कर्मचाऱ्यांची पदे पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या संवर्ग/आस्थापनेवरून प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय मरोळ यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्यात येऊन ती पदे पोलीस महासंचालक यांच्या जिल्हा संवर्गावर स्थलांतरीत करण्यात येत आहेत.

या पदावरील कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या या संबंधित परिक्षेत्रीय पोलीस उपमहानिरीक्षक [ठाणे परिक्षेत्र-नवी मुंबई] व पोलीस महासंचालक, यांचेद्वारे करण्यात येतील. तथापि, लिपीक वर्ग-३ पदोवरील नियुक्त्या विहीत मार्गाने करणेस प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, हे सक्षम राहतील.

[७] पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळचे पर्यवेक्षण व नियंत्रण संपूर्णत: विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके व पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, यांचे अधिपत्याखाली वर्ग केल्यामुळे पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ यांच्या आस्थापनेवरील वर्ग-४ ची पदे ही पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या संवर्ग/आस्थापनेवरून प्राचार्य पोलीस प्रशिक्षण विद्यालय यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्यात येत आहेत. त्यांच्या नियुक्त्या या प्राचार्य पोलीस प्रशिक्षण विद्यालय, यांचेद्वारे विहीत मार्गाने करण्यात येतील.

[८] प्रशिक्षण काळात पर्यवेक्षकांचे पोलीस प्रशिक्षणार्थींबरोबर प्रशिक्षण विद्यालयाच्या आवारात वास्तव्य आवश्यक असते. म्हणून राज्यातील इतर पोलीस प्रशिक्षण विद्यालयाच्या आवारात पर्यवेक्षकांना निवासस्थाने पुरविण्यात येतात. सध्या पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ येथे नियुक्तीस असलेल्या संख्याबळाच्या ३/४ अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्त, मुंबई यांनी पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळच्या परिसरालगत निवासस्थाने पुरविण्यात आलेली आहेत, परंतु आणखी दोन राखीव पोलीस उपनिरीक्षक, अठरा पोलीस हवालदार, [कवायत निदेशक], एक पोलीस शिपाई यांना निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत. तेव्हा पोलीस आयुक्त, मुंबई यांनी सध्या उपलब्ध करुन दिलेली निवासस्थाने अधिक वर नमूद २१ निवासस्थाने उपलब्ध करुन देऊन ती सर्व निवासस्थाने प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ यांच्या नावे चिन्हांकित करावीत. सदर चिन्हांकित केलेल्या निवासस्थानाचे वाटप प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ यांचेद्वारे करण्यात येईल. जेव्हा पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ यांचे आवारात अधिकारी/कर्मचारी यांची निवासस्थाने बांधून होतील त्यावेळी त्या प्रमाणानुसार चिन्हांकित

करण्यात आलेली वरील निवासस्थाने ही पोलीस आयुक्त, मुंबई यांना ~~[illegible]~~ ~~येतील~~ परत सुपूर्द करण्यात येतील.

[९] सध्या पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळकरिता आवश्यक असलेली वाहने पोलीस आयुक्त, मुंबई यांचेकडून घेण्यात येतात. ही वाहने पोलीस आयुक्त, मुंबई यांनी प्राचार्य पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्यात यावीत. पोलीस× पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ यांच्या आस्थापनेवर नवीन वाहने उपलब्ध झाल्यावर पोलीस आयुक्त, मुंबई यांचेकडून तूर्त स्वरूपात वर्ग करण्यात आलेली वाहने पोलीस आयुक्त, मुंबई यांना परत करण्यात यावीत. पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ येथील वाहनांचे परिरक्षण हे पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या आस्थापनेवरील मोटार परिवहन विभागाद्वारे करण्यात येईल.

[१०] पोलीस आयुक्त, मुंबई यांनी सध्या पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ साठी उपलब्ध करून दिलेल्या जागेचे एकूण क्षेत्रफळ व चतु:सीमा निश्चित करून ले-आउट प्लॅन तयार करून संबंधित नकाशाच्या ~~[illegible]~~× साक्षांकित प्रती प्राचार्य पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ, विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि इतर संबंधितांना देण्यात ~~[illegible]~~ यावयात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ना. गो. काकडे]

उप सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,

पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस आयुक्त, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस उपनिरीक्षक पोलीस मोटार वाहन परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे/पो. उपआयुक्त, मो. परिवहन, मुंबई.

प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ, मुंबई.

महालेखापाल, महाराष्ट्र-१ [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई-१,

महालेखापाल, महाराष्ट्र-१ [लेखापरीक्षा] मुंबई-१,

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

सर्व सह सचिव/उपसचिव [गृह विभाग].

वित्त विभाग व्यय-७/बीयुडी-१०.

गृह विभाग, बीयुडी-१, २ व ३, पोल-७.

[illegible]